# लाखपुरी येथे पिके, जमीन खरडली

**अकोला (प्रतिनिधी) :** मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथे शनिवारी (ता. १४) रात्री सात ते नऊ या वेळेत जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे लाखपुरी शिवारातील नाल्याला पूर आला. या पाण्याने लाखपुरी गावशिवारातील शेकडो एकर जमीन खरडून गेली. या नुकसानीचे सर्वेक्षण करून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे.

शनिवारी लाखपुरी परिसरात जोरदार पाऊस झाला. यामुळे नाल्याला मोठा पूर आला. नाल्याला आलेल्या पुराचे हे पाणी शेतांमधून वाहिले. या भागात जूनमध्ये पेरणी झाली होती. पिकेही चांगली अंकुरली होती. अशातच शनिवारी पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. पावसाचे पाणी शेतातून वाहले आणि पिके तर खरडून गेली, शिवाय जमीनही खरडली. या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण केले जावे व मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी पुरुषोत्तम डागा, अतुल नवघरे, जीतप्रसाद कैथवास, काशिनाथ धानोरकर, सोमेश दहापुते, सुमीत मेश्राम, रेपाटखेडचे सरपंच नागसेन जामनिक यांनी केली आहे. या अनुषंगाने मूर्तिजापूर उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही पाठवण्यात आले आहे.



**अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.**

सकाळ ॲग्रोवन www.agrowon.com मित्र मातीच्या जिवाचा...
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित

ॲग्रोवन संवाद

**'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

कार्यक्रम वेळापत्रक

**शुक्रवार, २० जुलै २०१८**

**विषय - सोयाबीन, कपाशी व तूर पिकाचे किड व्यवस्थापन**
**वक्ते - आर. एस. डवरे**
(किटकशास्त्रज्ञ, केव्हीके, करडा, ता. रिसोड, जि. वाशिम)
**श्री. सचिन कांबळे**
(तालुका कृषी अधिकारी)
**स्थळ** - विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान, मु. पो. कवठळ, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम, **वेळ** - सायं. ६ वा.

**विषय - खरिप पिकांचे किड व खत व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. प्रशांत उंबरकर**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ, प्रमुख, केव्हीके, सेलसुरा, वर्धा)
**डॉ. रुपेश झाडोदे**
(विषय विशेषज्ञ, कृषी विद्या, केव्हीके, सेलसुरा वर्धा)
**स्थळ** - सांस्कृतिक भवन, मु. पो. दहेगाव, ता. सेलू, जि. वर्धा, **वेळ** - सांय. ५.३० वा.

**विषय - खरीप पिकाचे किड व्यवस्थापन**
**वक्ते - श्री. संजय नवले** (आत्मा तंत्र व्यवस्थापन, अमरावती)
**स्थळ** - ग्रामपंचायत हॉल, सातेगाव, ता. अंजनगाव, जि. अमरावती, **वेळ** - सायं. ६ वा.

**विषय - सोयाबीन, कपाशी पिकाचे किड व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. सुरेश नेमाडे** (वरिष्ठ शास्त्रज्ञ, केव्हीके, यवतमाळ)
**डॉ. प्रमोद मगर** (किडरोग शास्त्रज्ञ, केव्हीके, यवतमाळ)
**श्री. पी. एम. देशमुख** (जिल्हा व्यवस्थापक, महाबीज)
**स्थळ** - ग्रामपंचायत सभागृह, मांडवा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ, **वेळ** - सायं. ६ वा.

**विषय - सोयाबीन, कपाशी पिकाचे किड व्यवस्थापन**
**वक्ते - एस. एम. मकासरे** (तालुका कृषी अधिकारी, पातुर, जि. अकोला)
**श्री. मंगेश झामरे** (ता. तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा, ता. पातुर, जि. अकोला)
**स्थळ** - जि. प. उर्दू शाळे समोर, समाज मंदिर, आलेगाव, ता. पातुर , जि. अकोला, **वेळ** - सायं. ६ वा.

**विषय - खरिप पिकांचे खत व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. नरेंद्र नाईक** (पी. डी. आत्मा, बुलडाणा)
**श्री. ए. पी. सुरडकर** (कृषी तज्ज्ञ, चिखली)
**स्थळ** - हनुमान मंदिर सभागृह, वानखेड, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा, **वेळ** - सायं ५.३० वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# बुलडाणा, वाशीममध्ये दूध दरप्रश्नी आंदोलनाची धग कायम

**अकोला (प्रतिनिधी) :** दुधाला प्रतिलिटर पाच रुपये दर वाढवून मिळावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तीन दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. तिसऱ्या दिवशी बुधवारी (ता.१८) बुलडाणा, वाशीममध्ये आंदोलनाची धग कायम होती. बुधवारी खामगाव तालुक्यातील मांडका गावात 'स्वाभिमानी'च्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याची प्रेतयात्रा काढून दहन केले. दुसरीकडे वाशीम जिल्ह्यात रिसोड येथे काही पदाधिकाऱ्यांनी चक्क गाढवाला दूध पाजून सरकारचा निषेध नोंदवला.

खामगाव तालुक्यातील मांडका गावात श्याम अवथळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याची प्रेतयात्रा काढून दहन केले. दूध उत्पादकांच्या मागण्या मान्य न झाल्यास मंत्र्यांच्या गाड्या पेटवू असा इशारा या वेळी अवथळे यांनी दिला. या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गिरीधर देशमुख, शेख युनूस भाई, अनिल मिरगे, सोपान खंडारे, रामकृष्ण जुमळे, संजय बोचरे, विठ्ठल महाले, रोशन देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी गाढवाला दूध पाजण्याचा प्रयत्न करीत शासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

दुधाच्या वाहनाच्या काचा फोडल्याचा आरोप असलेले 'स्वाभिमानी'चे मोताळा तालुकाध्यक्ष सय्यद वसीम यांना बोराखेडी पोलिसांनी मंगळवारी (ता.१७) सकाळी अटक केली. न्यायालयात हजर केले असता जामिनावर सुटका करण्यात आली. या प्रकरणातील इतर आरोपी फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

रविवारी (ता.१५) मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास संतप्त कार्यकर्त्यांनी मोताळा-बुलडाणा मार्गावरील वाघजाळ फाट्यानजीक दूध वाहतूक करणाऱ्या आयशर वाहनाच्या काचा फोडून दुधाच्या पिशव्या रस्त्यावर फेकल्या होत्या.

### बुलडाण्यात आंदोलनाचा जोर कायम

'स्वाभिमानी'च्या कार्यकर्त्यांनी मेहकरमध्ये बुधवारी (ता.१८) पहाटे दूधाचे टँकर अडवून फोडले. बुधवारी सकाळी चिखली शहरात बस अडवून दगडफेक करण्यात आली. चिखलीत गोविंद डेअरीचे वाहन अडवून त्यातील सर्व दूध रस्त्यावर फेकण्यात आले. जळगाव जामोद तालुक्यात निंभोरा फाट्याजवळ बुधवारी दुपारी बस फोडण्यात आली. देऊळगावराजात कार्यकर्त्यांनी दुधाची दोन वाहने अडवून त्यातील दूध रस्त्यावर ओतले. बुलडाणा शहरात टिपू सुलतान चौकात कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. वाशीम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यात चांडस गावाजवळ बुधवारी दुपारी बस फोडली.

### आजपासून चक्काजाम आंदोलन

दूध उत्पादकांच्या मागणीसाठी सुरू असलेले हे आंदोलन अधिक तीव्र केले जाणार आहे. शेतकरी व कार्यकर्त्यांनी गुरुवारी (ता.१९) आपल्या घरची जनावरे, संपूर्ण कुटुंब, भाजीभाकरी घेऊन रस्त्यावर उतरावे. जोपर्यंत सरकार दूध उत्पादकांची मागणी मान्य करीत नाही तोवर रस्त्यावरून उठायचे नाही, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केले.

# बोंड अळी नियंत्रणासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी नवाल : मोहिमेत सहभागी न होणाऱ्या मिल मालकांवर कारवाई

**वर्धा (प्रतिनिधी) :** गुलाबी बोंड अळी नियंत्रणासाठी शिफारसीत उपाय योजनांची अंमलबजावणी जिनिंग प्रेसिंग मालक, व्यवस्थापकांनी करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी शैलेश नवाल यांनी दिली. बोंड अळी नियंत्रणासाठीच्या या मोहिमेत सहभागी न होणाऱ्या मिल मालकांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

वर्धा येथे नुकतीच जिनिंग व्यावसायिकांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी श्री. नवाल बोलत होते. जिनिंग व्यावसायिकांनी मिलच्या आतील व बाहेरील परिसर स्वच्छ करून कुठेही बोंडअळीचे पतंग तयार होऊन त्यांचा प्रसार होणार नाही याची दक्षता घ्यावी, पतंगाचा अटकाव करण्यासाठी प्रत्येकी दहा मीटर अंतरावर एक याप्रमाणे सर्व ठिकाणी कामगंध सापळे लावावेत. त्यामध्ये सापडणाऱ्या पतंगाची गणना करून तालुका कृषी अधिकाऱ्यांना कळवावे. कोणत्याही ठिकाणी सरकीपासून झाडे उगवू देऊ नये, ठिकठिकाणी प्रकाश सापळे संध्याकाळी सहा ते ११ वाजेदरम्यानच्या कालावधीत लावून त्यात जास्तीत जास्त पतंग जमा होतील, असे पहावे. शिफारसीत सूचनांप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या मिल मालकांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यासोबतच पर्यावरण कायद्याअंतर्गत परवाना रद्द करण्याबाबत मंत्रालयास प्रस्ताव पाठविण्यात येईल आणि गुन्हाही दाखल केला जाईल, असेही जिल्हाधिकारी नवाल यांनी सांगितले. सर्व मिलधारकांनी सामाजिक जबाबदारी समजून त्यांच्या दोन किलोमीटर परिसरातील शेतकऱ्यांना कामगंध सापळे वितरीत करावे. किमान एक हजारावर शेतकऱ्यांना कामगंध सापळ्याचे वितरण करावे, अशीही सूचना त्यांनी केली. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. विद्या मानकर यांनी आभार मानले.

# पीककर्ज वाटपाला गती येईना

**पिंपळगाव सैलानी, जि. बुलडाणा :** मागील काही दिवसांपासून शेतकरी महत्वाची कामे सोडून केवळ पीककर्ज कसे मिळेल यासाठी प्रयत्न करीत आहेत. मात्र कर्जवाटपाची गती वाढत नसल्याने शेतकरी विवंचनेत सापडले आहेत.

रायपूर गावात सेंन्ट्रल बँक ही एकमेव राष्ट्रीयीकृत बँक आहे व त्या बँकेला परिसरातील पिंपळगाव सराई, मातला, सिंदखेड, पांग्री, केसापूर, सोनेवाडी, पळसखेड भट ही गावे जोडली आहेत. या बँकेची खातेदार संख्या तुलनेत जास्त आहे. शाखा व्यवस्थापक, कॅशिअर, कर्ज विभागातील कर्मचारी असे तीनच कर्मचारी या बँकेचे कामकाज चालवतात. कर्मचाऱ्यांवर कामचा ताण असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रायपूर सेन्ट्रल बँकेत कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून शेतकरी व खातेदारांना योग्य सेवा द्यावी, अशी मागणी रमेश तरमळे, जगन्नाथ पाटोळे, नारायण उबाळे यांनी मागणी केली आहे.